दै. देशोन्नती दि. ०५/०९/२०२२

दै. देशोन्नती दि. ०५/०९/२०२२

# फुलमाळ तांडा येथे चक्क घरासमोर गांजाची लागवड; ३२ हजाराचा गांजा जप्त

## उस्माननगर पोलिसांची कारवाई, ११२ वर प्राप्त झाली होती तक्रार

### एकजण ताब्यात

देशोन्नती वृत्तसंकलन...

**उस्माननगर** ■ चक्क राहत्या घराच्या अंगणात गांजाची लागवड केल्याचा प्रकार लोहा तालुक्यातील फुलमाळ तांडा येथे उस्माननगर पोलिसांनी ३ सप्टेंबर रोजी रात्री हेल्पलाईन क्र.११२ वर करण्यात आलेल्या तक्रारीवरुन उघडकीस आला आहे. यामध्ये पोलिसांनी ३२ हजार रुपये किंमतीचा ६ किलो ४०० ग्रॅम गांजा जप्त करून एकास ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी उस्माननगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



लोहा तालुक्यातील फुलमाळ येथील संतोष चव्हाण यांच्या मालकीच्या घरी राहत असलेल्या घरासमोरील अंगणात रामधन राठोड(६५) याने गांजाची झाडे लावल्याची गुप्त माहिती हेल्पलाईन क्र.११२ वरुन पोलिसांना मिळाली. या माहितीवरुन कंधार पोलिस ठाण्याचे पो.नि. पडवळ, पोउपनि. पल्लेवाड, उस्माननगर ठाण्याचे सपोनि पांडुरंग भारती व कर्मचाऱ्यांनी ३ सप्टेंबर रोजी रात्री १०.१५ वाजता सदर ठिकाणी धाड टाकली.

यावेळी पाहणीत अंगणात विनापरवाना गांजाची दोन झाडे लावल्याचे आढळून आले.. यामध्ये पोलिसांनी रामधन राठोड यास ताब्यात घेऊन ३२ हजार रुपये किंमतीचा ६ किलो ४०० ग्रॅम गांजा जप्त केला. याप्रकरणी सपोनि पांडुरंग भारती यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन उस्माननगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

दै. लोकमत दि. ०५/०९/२०२२.

दै. लोकमत दि. ०५/०९/२०२२

# आता सायबर सुरक्षा व्हॅन करणार शहरातील गणेश मंडळांपुढे जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** गेल्या काही वर्षांत सायबर गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्याद्वारे नागरिकांच्या लाखो रुपयांवर गंडा घालण्यात आला आहे. त्यामुळे सायबर गुन्हेगारीबाबत जनजागृती करण्यासाठी नांदेड पोलीस दलातील सायबर विभागाने सायबर सुरक्षा जनजागृती व्हॅन तयार केली आहे.

आर्थिक व्यवहार करताना, सोशल मीडियाच्या वापरावेळी कोणत्या गोष्टी कराव्यात व करू नयेत याबाबत चित्रफीत तयार करण्यात आल्या आहेत. या व्हॅनद्वारे गणेश मंडळांपुढे जनजागृतीस सुरुवात



करण्यात आली आहे. सायबर गुन्हेगारीच्या घटना वाढल्या आहेत. त्या दृष्टीने नागरिकांमध्ये जनजागृतीची गरज आहे. पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सेलने ही व्हॅन तयार केली आहे. सोशल मीडिया, आर्थिक व्यवहार ऑनलाईन करताना कोणती काळजी घ्यावी.

सायबर अपराधापासून बचाव कसा करावा याबाबत ऑडिओ व व्हिडीओद्वारे माहिती एलईडी स्क्रीनवर देण्यात आली आहे. प्रत्येक गणेश मंडळासमोर ही सायबर व्हॅन नागरिकांमध्ये जनजागृती करणार आहे. पोलीस अधीक्षक शेवाळे यांच्या हस्ते या व्हॅनचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक नीलेश मोरे, उपाधीक्षक अश्विनी जगताप, पो.नि. द्वारकादास चिखलीकर, पो.नि. एन.डी. उबाळे, स.पो.नि. शिवाजी लष्करे, पो.उप.नि. गंगाप्रसाद दळवी, एस.एन. थोरवे, सुरेश वाघमारे, राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे, विलास राठोड, रेश्मा पठाण, अनिता नलगोंडे, किशोर जयस्वाल, मोहन स्वामी, दीपक शेवाळे, काशीनाथ कारखेडे हे उपस्थित होते.